**माता-मृत्यू अन्वेषणा संदर्भात राज्य स्तरीय कृती दल स्थापन करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः आरसीएच २०१०/प्र.क्र.२८/आरोग्य ७-ब
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२५
दिनांक : ४ ऑक्टोबर २०१०.

**वाचाः** शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, निर्णय क्रमांक- आरसीएच २०१०/प्र.क्र.२८/आरोग्य ७-ब दि.२८/५/२०१०.

**प्रस्तावना-** आरसीएच-२ कार्यक्रमामध्ये " माता-मृत्यू अन्वेषण " हे ठळकपणे महत्वाचे धोरण म्हणून स्विकारले आहे. या धोरणामुळे गरोदरपणात व प्रसूती दरम्यान द्यावयाच्या सेवांमध्ये गुणवत्तापूर्ण सुधारणा तसेच मातांमधील आजारांचे व मृत्यूचे प्रमाण कमी करता येणे शक्य आहे. आरोग्य संस्थेमधील व गाव पातळीवरील घरी होणाऱ्या माता-मृत्यूंसाठी आढळून येणाऱ्या विविध कारणांवर उपाययोजना करण्यासाठी धोरणात्मक निर्णय व नियोजन करण्यासाठी " माता-मृत्यू अन्वेषण " हे एक महत्वाचे साधन आहे..

महाराष्ट्र राज्यात " माता-मृत्यू अन्वेषण " हे आरोग्य संस्था स्तरावर तसेच समाजाच्या स्तरावर होत आहे. आता केंद्र शासनाच्या प्रजनन व बाल आरोग्य टप्पा- दोन (RCH-II) कार्यक्रमामधील धारेणानुसार सदरची कार्यवाही राज्यातील सर्व जिल्हयात समान पध्दतीने दिनांक १ मे २०१० पासून राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असून यासाठी मार्गदर्शक तत्वांसहित जिल्हा व महानगरपालिका स्तरावरच्या गुणवत्ता अभिवचन समित्या उपरोक्त दिनांक २८/५/२०१० च्या शासन निर्णयानुसार गठीत करण्यात आलेल्या आहेत. या धोरणांनुसार माता-मृत्यू अन्वेषणासंबंधी राज्य स्तरीय कृती दल (State Level Task Force) गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-** माता-मृत्यू अन्वेषणा संदर्भात राज्य स्तरीय कृती दल (State Level Task Force) खालीलप्रमाणे गठित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सचिव-१, सार्वजनिक आरोग्य विभाग. | अध्यक्ष |
| २ | सचिव-२, सार्वजनिक आरोग्य विभाग. | उपाध्यक्ष |
| ३ | संचालक, आरोग्य सेवा, मुंबई. | सदस्य |
| ४ | अभियान संचालक, एनआरएचएम, मुंबई. | सदस्य |
| ५ | विभाग प्रमुख, शल्य चिकित्सा, लोकमान्य टिळक महानगरपालिका रुग्णालय(सायन रुग्णालय), मुंबई. | सदस्य |
| ६ | विभाग प्रमुख, प्रसूती व स्त्रीरोग तज्ञ, नायर रुग्णालय, मुंबई. | सदस्य |
| ७ | विभाग प्रमुख, विकृती चिकित्सा, ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई. | सदस्य |
| ८ | विभाग प्रमुख, भूलतज्ञ, ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई. | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ९ | विभाग प्रमुख, औषध वैद्यक, जी. एस. शेठ वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई. | सदस्य |
| १० | मूत्रविकार तज्ञ, ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई. | सदस्य |
| ११ | फॅमिती प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया यांचे प्रतिनिधी. | सदस्य |
| १२ | फेडरेशन ऑफ ऑबस्ट्रेट्रिक्स अॅन्ड गॉयनोकॉजिस्ट सोसायटीऑफ इंडिया यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १३ | उप संचालक, आरोग्य सेवा, प्रभारी मंडळ (संबंधित) | सदस्य |
| १४ | सह संचालक, आरोग्य सेवा (कुटुंब कल्याण) पुणे. | सदस्य सचिव |

राज्यामध्ये आरोग्य संस्थाच्या स्तरावर आणि समाजाच्या स्तरावर माता- मृत्यू अन्वेषण करण्यात येते. जिल्हास्तरीय आढावा समितीमार्फत प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आढावा घेवून या बैठकीचा कार्यवृत्तांत राज्य स्तरीय कृती दलास सादर करण्यात येईल.

राज्य स्तरीय कृती दलाची बैठक दर सहा महिन्यांतून एक वेळा आयोजित करणे आवश्यक राहील. राज्य स्तरीय कृती दल जिल्हयाच्या बैठकीतील कार्यवृत्तांतावर चर्चा करुन शासनास रणनिती (Stratgy) धोरण निश्चित करण्यासाठी शिफारस करेल.

राज्य स्तरीय कृती दलातील अशासकीय सदस्यांना शासनाच्या नियमानुसार मानधन व प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील. यावरील खर्च आरसीएच पी. आय. पी. मध्ये करण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात यावा.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(चारुशीला तांबेकर)
महाराष्ट्र शासनाच्या उपसचिव

प्रति,
अभियान संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
जिल्हाधिकारी, (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, (कुटुंब कल्याण) पुणे.
सहसंचालक , आरोग्य सेवा, (कुटुंब कल्याण) पुणे.
उपसंचालक, आरोग्य सेवा, प्रभारी मंडळ (सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, (सर्व)
विभाग प्रमुख, शल्य चिकित्सा, लोकमान्य टिळक महानगरपालिका रुग्णालय,(सायन रुग्णालय) मुंबई.
विभाग प्रमुख, प्रसूती व स्त्रीरोग तज्ञ, नायर रुग्णालय, मुंबई.
विभाग प्रमुख, विकृती चिकित्सा, ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई.
विभाग प्रमुख, भूलतज्ञ, ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई.
विभाग प्रमुख, औषध वैद्यक, जी. एस. शेठ वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई.
मूत्रविकार तज्ञ, ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई.
फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया यांचे प्रतिनिधी.
फेडरेशन ऑफ ऑबस्ट्रेट्रिक्स अॅन्ड गॉयनोकॉजिस्ट सोसायटीऑफ इंडिया यांचे प्रतिनिधी
सचिव-१, सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचे स्वीय सहाय्य.
सचिव-२, सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचे स्वीय सहाय्य.
मा. मंत्री(आरोग्य) / मा. राज्यमंत्री (आरोग्य)यांचे स्वीय सहाय्य.
अवर सचिव (कु.क.-१/२)सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती आरोग्य -७ अ/ब सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

--------------

| | | |
|---|---|---|
| ८ | विभाग प्रमुख, भूलतज्ञ, ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई. | सदस्य |